'ज्ञान ,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार -शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे'

Shri Swami Vivekananda Shikshan Sanstha, Kolhapur's

# ARTS AND COMMERCE COLLEGE, NAGTHANE

Tal. and Dist. – Satara (M.S.) 415519

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

Accredited by NAAC at "B" Grade (CGPA-2.36)



## NATIONAL SEMINAR

Indian Council of
Social Science Research

ORGANISED BY

## Departments of Social Sciences

SPONSORED BY

## INDIAN COUNCIL OF SOCIAL SCIENCE RESEARCH (ICSSR)

ON

# "DIMENSIONS OF THE RURAL DEVELOPMENT IN INDIA AFTER THE INDEPENDENCE"

Friday, February 22, 2019

Chairperson
Dr. Subhash Shelake
I/C Principal
Chief Editor
Prof. Dipak Gurav

*One Day National Seminar*

*On*

# *"Dimensions of the Rural Development in India after the Independence"*

**First Edition:** 22nd February, 2019

**Organized by:**
*Shri Swami Vivekananda Shikshan Sanstha, Kolhapur's*
ARTS AND COMMERCE COLLEGE, NAGTHANE
Tal. And Dist. – Satara (M.S.) 415519

**Published by:** Aarhat Publication & Aarhat Journal's
**Website:** www.aarhat.com
**Mobile No:** 9822307164 / 8355852142

**AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL (AMIERJ)**

***SJIF Impact Factor 6.236***

***Peer Reviewed Journal***

***ISSN 2278-5655,***

**Volume–VIII, Special Issue–XIII**

**EDITORS:**

**Disclaimer:**

The views expressed herein are those of the authors. The editors, publishers and printers do not guarantee the correctness of facts, and do not accept any liability with respect to the matter published in the book. However editors and publishers can be informed about any error or omission for the sake of improvement. All rights reserved.

All views expressed in the journal are those of the individual contributors. **Any issues with reference to the research paper, the individual author/s are responsible.** The editor and Publisher are not responsible for the statements made or the opinions expressed by the authors.

No part of the publication be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording and or otherwise without the prior written permission of the publisher and authors.

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | भारतातील ग्रामीण विकासाची एतिहासिक पार्श्वभूमी | श्रीम. सरकाळे तेजश्री तानाजी | 94 |
| 23 | फळबाग योजना व शरदचंद्रजी पवार | प्रा. डॉ. विश्वनाथ पवार | 99 |
| 24 | स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्रामीण विकास | प्रा. बाबासाहेब फळके | 103 |
| 25 | ग्रामीण विकासात साहित्य चळवळींचे योगदान | अनिल मोतीलाल वळवी | 106 |
| 26 | भारतातील ग्रामीण विकासातील समस्या | कु. रूपाली बबनराव पवार | 111 |
| 27 | भारतीय ग्रामीण समाजाचा समस्या एक चिकित्सक अभ्यास | प्रा. सविता सदाशिव नवले | 117 |
| 28 | ग्रामीण विकासात स्वतंत्र्य प्राप्तीनंतर पंचायत समीतीचे योगदान | डॉ. डी. बी. खराडे | 121 |
| 29 | किसान बाजार से भी नहीं बचता: 'बाजार में रामधन' के संदर्भ में | प्रा. संतोष तुकाराम बंडगर | 124 |
| 30 | भारत देशाच्या ग्रामीण विकासात खादी ग्रामोद्योगाचे महत्व | प्रा. अभय जायभाये<br>प्रा.सुनिल सामग | 127 |
| 31 | स्वतन्त्रता प्राप्ति के पश्चात् ग्रामीण विकास में अप्रैल, १९९९ तक की विभिन्न योजनाओं का योगदान | प्रा. कोते अंगद व्यंकटराव | 130 |
| 32 | आधुनिक तंत्रज्ञान व ग्रामीण विकास | डॉ. डी. एस. जाधव | 136 |
| 33 | ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या एस.टी. प्रवासातील समस्या | प्रा. संदीप लोखंडे | 139 |
| 34 | ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका | डॉ. प्रशांत विघे | 142 |
| 35 | ग्रामीण विकासातील प्रमुख अडथळा : अ. जाती व अ. जमातींची सद्य सामाजिक स्थिती | डॉ. लामतुरे नागेश टोपन्ना | 150 |
| 36 | मा. शरद पवार यांच्या कृषि सुधारणांमुळे झालेला ग्रामीण विकास | प्रा. डॉ. तुकाराम संतोष कदम | 156 |
| 37 | महाराष्ट्रातील पंचायत राज आणि ग्रामीण विकासाच्या समस्या | डॅ. आशिष काळे | 160 |
| 38 | अजिंक्यतारा किल्ल्यावरील निवडक शिल्पांचा अभ्यास | महेश हणमंत गुरव<br>नम्रता दादासाहेब पिंपळे | 164 |
| 39 | भारतातील ग्रामीण विकासात शेतीची समस्या | डॉ. दिपक राऊत | 167 |
| 40 | ग्रामीण विकासाबाबत महात्मा गांधीचे विचार आणि स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण विकासाची वाटचाल | प्रा.डॉ. अजितकुमार दादासो जाधव | 173 |
| 41 | ग्रामीण भारत बदलतोय! | प्रा. प्रकाश काशिनाथ गवळी | 179 |
| 42 | भारताच्या मानव विकास निर्देशाकांचे विश्लेषण | अस्लम द. अत्तार | 182 |
| 43 | स्वातंत्र्योत्तर हिंदी कविता में आदिवासी विमर्श | प्रा. बहिरम देवेंद्र मगनभाई | 187 |

# भारतातील ग्रामीण विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

श्रीम.सरकाळे तेजश्री तानाजी
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना –**

भारत हा खेड्यांचा देश म्हणून संपूर्ण जगामध्ये ओळखला जातो. भारत नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध तर आहेच, पण भारत हा गरीब लोकांचा देश आहे, असे ही म्हटले जाते. त्यामुळे विकसित भारताचा मूलभूत आधार ग्रामीण विकास मानला जातो. भारतामध्ये बहुतांश जनता ग्रामीण भागात वास्तव्य करत आहे. ग्रामीण भागातील जनतेचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे, परंतु शेतीचा विकास म्हणजे ग्रामीण विकास एवढ्या एवढा मर्यादित अर्थ ग्रामीण विकासाचा होत नाहीत, तर ग्रामीण जनतेचा सर्वांगीण विकास म्हणजे ग्रामीण विकास होईल. यामध्ये शिक्षण, आरोग्य, वाहतूक, दळणवळण, निवारा, समाजकल्याण, उद्योगाचा विकास, व्यवसायाच्या संधी, तंत्रज्ञान प्रगती इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. भारतातील ग्रामीण विकासाचा अभ्यास करताना त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहणे महत्त्वाचे ठरते.

**उद्दिष्टे –**

भारतातील ग्रामीण विकासातील विविध टप्प्यांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून आढावा घेणे तसेच ग्रामीण विकासाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर थोडक्यात प्रकाशझोत टाकणे.

**व्याप्ती –**

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती सन 1952 ते 2017 एवढ्या प्रदीर्घ कालखंडातील असून यामध्ये पंचवार्षिक योजना तील ग्रामीण विकासातील कार्यक्रमांवर थोडक्यात प्रकाशझोत टाकला आहे.

**संशोधन पद्धती व साधने –**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती तसेच सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. या शोधनिबंधासाठी प्राथमिक साधने पंचवार्षिक योजनाचे आर्थिक पाहणी अहवाल तसेच शासनाच्या अधिकृत संकेत स्थळांचा वापर करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन –**

भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडात पासूनच ग्रामीण अर्थव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता. तसेच रवींद्रनाथ टागोरांनी 1921 मध्ये शांतिनिकेतन ची स्थापना ग्रामीण पुनर्स्थापनेसाठी केली होती. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण विकासासाठी विविध संस्था व योजनांच्या माध्यमातून यशस्वी प्रयत्न करण्यात आले. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर अधिक भर देण्यात आला. तसेच सन 1952 च्या सामुदायिक विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामीण विकासावर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला.

**सामुदायिक विकास कार्यक्रम** 1952–

सामुदायिक विकास विकास कार्यक्रमाचे जनक महात्मा गांधी होते त्यांच्या मते, देशातील अधिकांश जनता ग्रामीण भागात वास्तव्य करते, त्यामुळे ग्रामीण विकास आवश्यक आहे. गांधीजींचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने योजना आयोगाने पहिल्या पंचवार्षिक योजनांमध्ये सामुदायिक विकास कार्यक्रम 2

ऑक्टोबर 1952 रोजी सुरू केला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जाती युक्त परंपरागत समाजाला समुदाययुक्त समाजामध्ये परिवर्तित करणे होता. सामुदायिक विकास कार्यक्रम अपेक्षित यश प्राप्त करू शकला नाही. यातून एक गोष्ट पुढे आली की, सामाजिक, आर्थिक विकासासाठी ग्रामीण लोकांची प्रभावी भागीदारी असणे आवश्यक आहे. यातूनच पुढे ग्रामीण क्षेत्रातील तसेच कृषी क्षेत्रातील सुधारणांसाठी ग्रामीण सहकारी संस्थांच्या स्थापनेवर भर देण्यात आला. हे सर्व कार्यक्रम समुदाय विकास कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात आले आणि कार्यक्रम राबवण्याची जबाबदारी राज्य सरकारवर ती टाकण्यात आली.

**ग्रामीण विकास विभागाचा इतिहास–**

सामुदायिक कार्यक्रम सामुदायिक विकास कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण विकासावर भर देण्यात आला. हा कार्यक्रम ग्रामीण विकासाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. या कार्यक्रमात अनेक बदल कालानुरूप होत गेले. तसेच हा विभाग विविध मंत्रालयाच्या अंतर्गत समाविष्ट करण्यात आला

1.ऑक्टोबर 1974 रोजी ग्रामीण विकास विभाग खाद्य व कृषी मंत्रालयाच्या एक भाग म्हणून अस्तित्वात आला.

2.ऑगस्ट 1979 मध्ये ग्रामीण विकास विभाग ग्रामीण पुनर्निर्माण मंत्रालयात समाविष्ट करण्यात आला.

3.23 जानेवारी 1982 रोजी या मंत्रालयाला ग्रामीण विकास मंत्रालय असे नाव देण्यात आले.

4.जानेवारी 1985 मध्ये ग्रामीण विकास मंत्रालय पुन्हा एकदा कृषी आणि ग्रामीण विकास मंत्रालय मध्ये अंतर्भूत करण्यात आले.

5.5 जूलै 1991 ला ग्रामीण विकास मंत्रालय एक विभागाच्या स्वरूपात तयार केली गेल

6.मार्च 1995 मध्ये मंत्रालयाचे नाव ग्रामीण क्षेत्र तथा रोजगार मंत्रालय असे करण्यात आले यामध्ये तीन विभागांचा समावेश करण्यात आला. ग्रामीण रोजगार तथा गरिबी निर्मूलन विभाग व ग्रामीण विकास विभाग व पडीक भूमी विकास विभाग.

7. 1999 मध्ये या मंत्रालयाचे नाव बदलून ग्रामीण विकास मंत्रालय ठेवले गेले.

**ग्रामीण विकास मंत्रालयाचा उद्देश –**

या मंत्रालयाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील गरिबी कमी करणे आणि रोजगार उपलब्ध सामाजिक सुरक्षा सृजनात्मक विकास तसेच संरचनात्मक विकास करणे हा आहे यासाठी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून संशोधन करण्यात आले तसेच नवीन कार्यक्रम लागू करण्यात आले विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या पंचवार्षिक योजना व ग्रामीण विकास पंचवार्षिक योजना भारतीय नियोजन आयोगामार्फत राबविल्या जातात तसेच राष्ट्रीय विकास परिषद पंचवार्षिक योजना अंतिम रूप या योजनांचा उद्देश वाहतूक औद्योगिक विकास तसेच सामाजिक न्याय साक्षरता व देशाचा सर्वांगीण विकास व्हावा हा असतो भारतामध्ये आतापर्यंत योजनांची करण्यात आली आहे या पंचवार्षिक योजना ग्रामीण विकासाला अधिक भर देण्यात आला आहे याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे –

**1.पहिली पंचवार्षिक योजना 1951 ते 1956–**

या योजनेअंतर्गत ग्रामीण विकास योजनेसाठी प्रामुख्याने शोषित कृषी तसेच सामुदायिक विकास सिंचन योजना ग्रामीण तसेच लघुउद्योग असे प्रमुख लक्ष ठेवण्यात आले होते एकूण योजना खर्चात खर्चाच्या 39 टक्के खर्च ग्रामीण विकास कार्यक्रमावर ती करण्यात आला होता या योजनेमुळे प्रतिव्यक्ती 11 टक्के तसेच खाद्यान्न उत्पादनात भरीव वाढ झाली.

2.दुसरी पंचवार्षिक योजना 1956 ते 1961–

या योजनेमध्ये पहिला योजनेप्रमाणेच ठरवण्यात आला होता कारण ग्रामीण क्षेत्राचा विकास व्हावा या उद्देशाने या योजनेमध्ये कृषी क्षेत्रावर 20 टक्के खर्च करण्यात आला होता.

3.तिसरी पंचवार्षिक योजना 1961 ते 1966–

या योजनेमध्ये कृषी व मूलभूत उद्योगांना प्राधान्य देण्यात आले होते या योजनेत ग्रामीण विकासासाठी 1995 करोड रुपये खर्च केले गेले जे एकूण खर्चाच्या 23 टक्के होते पण या कालखंडात चीन व पाकिस्तान बरोबर झालेल्या युद्धामुळे योजनेचे इच्छित परिणाम दिसून आले नाहीत.

4.चौथी पंचवार्षिक योजना 1969 ते 1974–

या योजनेअंतर्गत कृषी शिक्षण वैज्ञानिक शोध आरोग्य तसेच कुटुंब नियोजन कार्यक्रम यावर भर देण्यात आला होता. परंतु ग्रामीण भारताचा कणा कृषी अर्थव्यवस्था असल्याने मोठे लघु व कुटीर उद्योगवरील खर्च कमी करून कुटुंब नियोजन कार्यक्रमवर्ती हा खर्च करण्यात आला होता.

5.पाचवी पंचवार्षिक योजना 1974 ते 1979–

या योजनेमध्ये दारीद्र्य निर्मूलनाला प्राधान्य देण्यात आले होते श्रम कल्याण एकीकृत ग्रामीण विकास पहाडी आदिवासी क्षेत्र विकास कार्यक्रम लागू करण्यात आला या योजनांसाठी एकूण खर्चाच्या 24 टक्के रक्कम खर्च करण्यात आली.

6.सहावी पंचवार्षिक योजना 1980 ते 1985–

या योजनेमध्ये पोषण आहार ग्रामीण आवास दारिद्र निर्मुलन अशा योजना लागू करण्यात आल्या ग्रामीण विकास कार्यक्रमावर 26 टक्के खर्च करण्यात आला या योजनेमध्ये स्वातंत्र्यानंतर प्रथमच ग्रामीण विकासाच्या संकल्पनेला दृढतापूर्वक स्वीकारण्यात आले होते त्याच्या परिणामस्वरूप ग्रामीण निर्धंता निर्मूलन याच्यासाठी एकीकृत ग्रामीण विकास कार्यक्रमास सुरुवात झाली तसेच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम या योजना कालखंडातच सुरू झाला त्यामुळे या योजनेला ग्रामीण विकासाची प्रधान योजना म्हंटले जाते.

7.सातवी पंचवार्षिक योजना 1985 ते 1991–

या योजनेमध्ये उत्पादक रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला होता या योजनेमध्ये इंदिरा आवास योजना, दशलक्ष विहीर योजना, जवाहर रोजगार योजना सुरू करण्यात आल्या या योजनेमध्ये समाधानकारक प्रगती केली होती. या योजनेला 'रोजगार निर्मिती योजना' असे म्हंटले जाते. दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण 37 टक्क्यावरून 30 टक्क्यापर्यंत कमी झाले.

8.आठवी पंचवार्षिक योजना 1992 ते 1997–

या योजनेमध्ये मनुष्यबळ विकासावर भर देण्यात आला होता लोकसहभागाद्वारे ग्रामीण विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला. दारिद्र निर्मुलन, कृषी व ग्रामीण विकासाला प्राधान्य देण्यात आले.

9.नववी पंचवार्षिक योजना 1997 ते 2002–

या योजनेमध्ये उत्पादक रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात आले महिला व बालकल्याण, बेरोजगारी निर्मूलन, रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा, आरोग्य,शिक्षण, विद्युतीकरण, पाणीपुरवठा अशा विविध क्षेत्रांवर भर देण्यात आला. विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले. कृषी व ग्रामीणक्षेत्राला प्राधान्यक्रम दिला गेला.

10.दहावी पंचवार्षिक योजना 2002 ते 2007–

या योजनेत सर्वाधिक सामाजिक सेवांवर भर देण्यात आला होता. सर्व गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, तसेच ग्रामीण क्षेत्रात रोजगार उपलब्ध साठी विशेष प्रयत्न करण्यात आले होते.

11.अकरावी पंचवार्षिक योजना 2007 ते 2012–

या योजनेत वेगवान आणि सर्वसमावेशक विकासावर भर देण्यात आला. रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात आले. प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात आले. पायाभूत पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणावर भर देण्यात आला कृषी क्षेत्रावर भर दिला गेला. 2009 पर्यंत दारिद्र्य देषेखालील सर्वांना 24 तास विजेची व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

12. बारावी पंचवार्षिक योजना 2012 ते 2017 –

या योजनेअंतर्गत संपूर्ण ग्रामीण क्षेत्रांना क्षेत्रे मुख्य रस्त्यांना जोडून दळणवळणाची सोय करुन देण्यात आली. वीज व्यवस्था तसेच 100 दिवस रोजगार हमी योजना लागू करून ग्रामीण बेरोजगारी नष्ट करण्याचा उद्देश ठेवण्यात आला.

**निष्कर्ष–**

स्वातंत्र्यापासून आजपर्यंत ग्रामीण विकासाच्या अनेक योजना कार्यक्रम आणि पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून हे स्पष्ट होते की, विविध योजनांच्या कार्यक्रमाअंतर्गत अपेक्षित स्वरूपात अधिक विकसित लोकसंख्या समूह अधिकच विकसित झाला आहे, परंतु ग्रामीण क्षेत्रात झालेले संरचनात्मक बदल हे प्रभावी व संतोषजनक नाहीत. याचे कारण म्हणजे विविध विकास कार्यक्रमातील सुविधांचा लाभ देशातील लोकांना मिळतच नाही. सामाजिक,आर्थिक विषमता, राजकारणी व सरकारी अधिकारी तसेच जाती.धर्म आणि गुंडशाही इत्यादी घटकांच्या प्रभावामुळे या योजनांचा लाभ सधन वर्गातील लोकांना झाला आहे जवळजवळ 80 टक्के लाभ या वर्गाला झालेला आहे. सर्व योजनांचा उद्देश ग्रामीण जनतेची बेरोजगारी नष्ट करणे, दारिद्र्य कमी करणे असा असूनही आपल्या दुर्भाग्य मुळे या योजनांची यशस्वी पूर्ती आजही शक्य झालेले नाही. आजही स्वातंत्र्यानंतर 70 वर्षे ही काही ग्रामीण भागात मूलभूत सुविधा आणि वाहतुकीची साधने, शिक्षण, आरोग्य, वैज्ञानिक प्रगती, औद्योगिक विकास यांचा यथायोग्य लाभ मिळालेला नाही. त्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये मिळणे अपेक्षित होते.

**सारांश–**

भारत हा ग्रामीण भागात वसलेला देश आहे. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत भारतात ग्रामीण विकासासाठी अनेक योजना कार्यक्रम आणि पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून यशस्वी प्रयत्न करण्यात आले आहेत. ग्रामीण विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा भाग आहे. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून सरकारने ग्रामीण विकासावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. आतापर्यंत विविध योजना अमलात आणून त्याची यशस्वी रावविणूक देखील करण्यात आली आहे. ग्रामीण विकासातच भारताची प्रगती व उज्ज्वल भविष्य अपेक्षित आहे. उद्याच्या आर्थिक महासत्ता होणाऱ्या भारताला ग्रामीण विकास करणे क्रमप्राप्त आहे ग्रामीण भाग प्रगत संपन्न व आर्थिक स्वावलंबी झाल्यास प्रादेशिक असमतोल राहणार नाही. ग्रामीण विकासासाठी सरकार प्रशासकीय यंत्रणा तसेच स्थानिक यंत्रणा यांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. तरच ग्रामीण विकास साध्य करणे सहज शक्य आहे

संदर्भ सूची–


1. कटार सिंह अनिल सिसोदिया, ग्रामीण विकास– सिद्धांत नितीयां एवं प्रबंध पब्लिकेशन, नवी दिल्ली, 2016 अध्याय 9, पृष्ठक्रमांक 196

2.प्रतियोगिता दर्पण– भारतीय अर्थव्यवस्था, उपकार प्रकाशन, जयपुर,2004 पृष्ठ क्रमांक 135.

भारत 2015 पृष्ठक्रमांक 684

3.महिपाल, ग्रामीण पुनर्निर्माण पंचायत की भूमिका,सूचना प्रसारण मंत्रालय,नवी दिल्ली, 2002

4.डॉ. रमेश प्रसाद द्विवेदी, पंचवार्षिक योजना एवं ग्रामीण विकास,प्रवक्ता.कॉम

5.डॉ. झामरे,भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र,पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, वर्ष 2005 पृष्ठ क्रमांक 47 ते 59

6.कुरुक्षेत्र मासिक, ग्रामीण विकास मंत्रालय,नवी दिल्ली, जुलै 1999 पृष्ठ क्रमांक 10

7.डॉ. पळनीटकर, व्यावसायिक पर्यावरण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, वर्ष 2005, पृष्ठ क्रमांक 166, 184 ते 188